# महफिल-ए-प्रशांत २

## प्रशांत दांडेकर

राहुल देव बर्मन
सचिन देव बर्मन
शंकर जयकिशन
लक्ष्मीकांत प्यारेलाल
सलील चौधरी
मदन मोहन
वसंत देसाई

साहित्य प्रतिष्ठान ®





# महफिल-ए-प्रशांत २


प्रशांत दांडेकर

prashant.dandekar@rediffmail.com

9821947457




प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावट : सचिन काकडे

www. esahity. com

esahity@gmail. com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



©esahity Pratishthan®2015



## ꧁ प्रस्तावना ꧂

सर्वप्रथम सर्व रसिकांचे शतशः आभार ज्यांनी माझ्या पहिल्या पुस्तकाला, ‘महफिल -ए – प्रशांत - १' ला भरभरून प्रतिसाद दिला. रसिकांनी माझे खूप कौतुक केले पण त्याचबरोबर काही प्रेमळ तक्रारी पण केल्या, काही बहुमोल सूचना देखील केल्या. हे सर्व मला अपेक्षितच होते. प्रतिभावंत संगीतकारांचे गुणगान दोन - तीन पानांमध्ये करणे म्हणजे सूर्याला कवड्स्यामधून पकडण्यासारखे बालिश कृत्य आहे हे मला पूर्णपणे माहित आहे.

सज्जाद हुसेन पासून सुरुवात का केली नाही? , नौशाद यांच्याबद्दल लिहिताना मदर इंडियाचा उल्लेख का नाही? , उषा खन्ना, एन दत्ता यांच्या सारख्या कमी प्रसिद्ध संगीतकारांना विसरू नका, गुणी कलाकारांची फक्त झगमगती बाजू न दाखवता त्यांच्या आयुष्यातील स्ट्रगल पण लाईम लाईट मध्ये आणा अशा असंख्य सूचना पाहून तुम्ही सर्व जण किती जिव्हाळ्याने व बारकाईने माझे पुस्तक वाचले आहेत याची प्रचीती आली

काही वाचकांनी मला त्यांच्याकडे असलेले वाचनात न आलेले किस्से देखील पाठवून दिले व प्रेमाने सांगितले की हे किस्से जरूर वापरा व तुमचे लेख अजून माहितीपूर्ण बनवा. काहींनी तर घरी यायचे,



भेटण्याचे अगत्याचे आमंत्रण पण दिले; उद्देश्य हाच कि एकत्र बसून सुवर्ण काळाच्या आठवणी रात्रभर जागवत पहाटे पर्यंत सुरांच्या जगात फेरफटका मारून येणे

काही रसिकांना माझ्या लिखाणात ईसाक मुजावर यांची झलक दिसली. त्यांनी असे बोलणे हा मी माझा बहुमानच समजतो.



तर काहींना माझ्या लेखांमुळे पार त्यांच्या बालपणात रेडियोवर ऐकलेल्या गाण्याची आठवण आली. काहींना माझे लेख हे बहुमोल ठेवा वाटले; तुम्हा सर्वांना असे हरवलेले क्षण वेचून देण्यात मदत करताना मला देखील खूप समाधान मिळाले

एकदा पुस्तक हातात घेतल्यावर काहींना ते पूर्ण वाचल्याशिवाय चैन पडली नाही तर काहींना ते कधी वाचून संपले हे देखील कळले नाही. इतके समरस होऊन वाचणारे रसिक मिळाल्यावर मला दुसरा भाग लगेच काढणे क्रमप्राप्तच होते नाही का?
हे दुसरे पुस्तक तुम्हाला पहिल्या भागापेक्षा अधिक आवडेल अशी अपेक्षा आहे कारण या मध्ये आहेत लेख सचिन देव व राहुल देव या गाजलेल्या पिता पुत्राच्या जोडीबद्दल, सर्वाधिक फिल्म फ़ेअर पुरस्कार मिळवणाऱ्या शंकर जयकिशन बद्दल, सर्वाधिक वेळ प्रसिद्धीच्या शिखरावर राहणाऱ्या लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या बद्दल, मदन मोहन या गजलच्या शहेजादाबद्दल!

या दुसऱ्या भागानंतर लिहिण्याचा विचार आहे गीतकारांबद्दल. चित्रपट सृष्टीमध्ये अनेक संगीतकार आहेत त्यामुळे परत फिरून एकदा कधीतरी या राहिलेल्या सर्व संगीतकारांबद्दल जरूर लिहिणार आहे. पण सध्या तरी विचार आहे कि पुढले दोन भाग गीतकारांबद्दल लिहावेत. तर चला तर फिर बैठेंगे तीन यार मिलकर - मी, तुम्ही व आपले लाडके संगीतकार...!!





# अर्पण पत्रिका

माझा धाकटा मुलगा, सौमित्र याची माझ्याबद्दल नेहमी एक तक्रार असते; ‘बाबा जेव्हा पहावे तेव्हा तुम्ही टीव्ही वर तुमच्या जमान्यातील बोरिंग गाणी ऐकत असतात’. त्यावर माझे उत्तर असते, "तुला कसा तो डॉरेमोन परत परत पाहून कंटाळा येत नाही तसे माझे आहे". अनिच्छेने का होईना पण जुनी गाणी सतत कानावर पडल्याने आता ती सौमित्रला ही तोंडपाठ झाली आहेत. आता त्याला सुरुवातीचे म्युझिक चालू झाले तरी कोणते गाणे लागणार आहे ते कळू लागले आहे. मी त्याला आता मजेने म्हणतो,"तुला कशी रे आमच्या जमान्यातील गाणी आता गुणगुणावीशी वाटतात? " तेव्हा त्याचे उत्तर चक्रावून टाकणारे होते; म्हणाला,"म्युझिक सुरु झाले कि शब्द आपोआप ओठांवर येतात. मुद्दामून लक्षात ठेवावेच लागत नाहीत" बहुदा त्याला देखील शब्द व सुरांचा हा अद्भुत मेळ आता आवडू लागला आहे. माझ्या कॅम्प मध्ये नकळत येणाऱ्या माझ्या शेंडेफळाला, सौमित्रला त्यामुळे हे पुस्तक अर्पण करणे जास्त संयुक्तिक होईल.

प्रामुख्याने रोमेंटिक गाण्यांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या संगीतकारांचा या पुस्तकामध्ये समावेश असल्याने, हे पुस्तक माझ्या बायकोला, प्राजक्ताला संपर्पित करायला देखील मला तितकेच आवडेल.





# मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं ... पंचम



'बाप से बेटा सवाई', 'बाळाचे पाय पाळण्यात दिसणे' या म्हणींचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल तर राहुल देव बर्मन यांच्या जीवनपटाकडे पहावे. लहानगा राहुल पाच प्रकारे रडायचा, किंवा रडताना ५ व्या सुरात रडायचा. ज्यामुळे प चा उच्चार ऐकू यायचा. या गोष्टीमुळेच अशोक कुमार यांनी लहानग्या राहुलचे नाव ठेवले पंचम. या पंचमने वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी एक धून तयार केली जी उचलण्याचा मोह साक्षात सचिन देव बर्मन यांना झाला. पंचम जेव्हा मित्रांबरोबर देवआनंदला पाहायला थिएटर्स मध्ये गेला तेव्हा त्याला कळले कि फंटूश चित्रपटातील 'ए मेरी टोपी पलटके आ'ही चाल त्याच्याच पिताश्रींनी उचलली आहे. पंचम हळूहळू वडिलांच्या खांद्याला खांदा लावून संगीत क्षेत्रात वाटचाल करू लागला. 'सर जो तेरा चकराए' (प्यासा) ची चाल असो कि 'सोलहवा साल' मधील 'हैं अपना दिल तो आवारा' मधील माउथ ऑर्गनची सुरवात असो आर. डी. चे एस. डी. साठीचे योगदान चंद्रकले प्रमाणे वाढतच होते. वडील आजारी असताना व रफी हजला गेले असताना पंचमने मागच्या दाराने आपल्या मित्राला, किशोरला 'आराधना' चित्रपटात घुसवले. 'मेरे सपनोकी रानी' व 'कोरा कागज था ये मन मेरा' सारख्या सुरावटी, किशोरचा आवाज यांच्या मुळे आराधना अजूनच सुरेल बनला. कोमात गेलेल्या आपल्या पित्याचे शेवटचे स्वप्न,





म्हणजे 'मिली' चे संगीत पण याच श्रावण बाळाने पूर्ण केले. माऊथ ऑर्गन वाजविण्याच्या वेडापायी व आपल्या दोस्ती खातर पंचमने लक्ष्मीकांत - प्यारेलाल यांच्यासाठी दोस्ती चित्रपटात हे वाद्य स्वतः वाजविले, माऊथ ऑर्गनच कशाला आपला पंचम कशातूनही संगीत शोधायचा. शोले मधील 'मेहबूबा, मेहबूबा' या गाण्यासाठी बिअरच्या बॉटलमध्ये हवा फुंकून इफेक्ट साधणे असो की, 'चुरा लिया हैं तुमने' मध्ये कप बश्यांचा आवाज वापरून सुरेल किणकिण निर्माण करणे असो, पंचमची प्रयोगशीलता लाजवाब असायची. 'वाळू ('sand') पेपर घासून ही संगीत निर्माण करता येते किंवा गुळण्या करून देतील सत्ते पे सत्ता मध्ये बाबू खलनायकासाठी सिग्नेचर ट्यून बनविता येऊ शकते हे दाखवून दिले ते या अवलीयानेच. ट्वीन ट्रेकचा सर्वप्रथम उपयोग आर. डी. यांनी 'बहारोंके सपने' या चित्रपटात केला. पण तो खऱ्या अर्थाने तो लोकप्रिय झाला 'कतरा कतरा' या इजाजत मधील गाण्यामुळे. इलेक्ट्रॉनिक ऑर्गनचा उपयोग असो (ओ मेरे सोना रे) किंवा कुमार शानो सारखा नवीन आवाज असो दोन्हीचा श्रीगणेशा पंचम मुळेच झाला. पंचम काळाच्या पुढे पहाणारा संगीतकार होता. पण त्याच्यातील गुणवत्ता हुडकायची दृष्टी भल्याभल्यांकडे नव्हती. म्हणूनच 'तिसरी मंजिल' साठी जेव्हा नासिर हुसेन यांनी शंकर जयकिशन ऐवजी आर डी ला निवडले तेव्हा शम्मी कपूर खट्टू झाले होते. इतकेच कशाला 'दम मारो दम'हे गाणे ऐकून खुद्द सचिनदा एवढे वैतागले होते की त्यांना वाटले आपल्या तालमीत महतप्रयासाने घडवून देखील मुलाने त्यांचे नाव धूळीत मिळविले. पण कालांतराने त्याच पंचमला अनेकांनी मानले. अनिल विश्वास यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास







पंचम सारखा ऑल राउंडर (अष्टपैलू) कोणी झालाच नाही अगदी त्याचे पिताश्री एस. डी. देखील या शर्यतीमध्ये कुठेच नाही आहेत.
फिल्मफेअरने देखील संगीत क्षेत्रातील उदयोन्मुख प्रतिभावंत संगीतकाराला सन्मानित करण्यासाठी पंचमच्याच नावाने ट्रॉफी ठेवली. नाही म्हणायला गुरुदत्तसारख्या दुसऱ्या एका जिनियसने पंचमदा काय चीज आहे ते खूप आधीच ओळखले होते. खरे तर पंचमला संगीत दिग्दर्शनाचा पहिला मान दिला होता तो गुरुदत्तने, 'राज' या चित्रपटासाठी. पण हा चित्रपट प्रदर्शितच न झाल्याने हा मान मिळाला मेहमूदला.



पंचमला तोलामोलाची साथ कोणी दिली असेल तर ती गुलजारसाहेबांनी. गुलजार पंचमची स्तुती करताना थकतच नाहीत. त्यांच्या मते व्हिज्युअलायझेशन बाबतीत देखील आर. डी. ग्रेट होते. आर. डी. त्यांना विचारायचे की, फिल्म शुटींग नदीच्या किनारी होणार आहे का? असेल तर वातावरण निर्मिती साठी मी मांझी (नावाडी) चा आवाज, किंवा धून इंटरल्युड मुझिक म्हणून वापरेन. गेयता बिलकुल नसलेल्या 'मेरा कुछ सामान' सारख्या शब्दांना पंचमने जी चाल लावली त्यांनी टीकाकाराची तोंडे गप्प तर झालीच उलट त्यांच्या तोंडून स्तुती सुमने उधळली गेली. पंचमना चाल कुठेही सुचायची. 'तेरे बिना जिया जाए ना' ही चाल पंचम ला ट्राफिक जाम मध्ये सुचली हे ऐकून खरे वाटत नाही ना!



पण यशाचे दान पंचमना उशिराच मिळाले. अमरप्रेम, तिसरी मंझील या सारखे अविस्मरणीय संगीत देऊन देखील पंचमना पहिले फिल्मफ़ेअर मिळाले ते १९८३ साली.



'सनम तेरी कसम' या चित्रपटसाठी. आर. डी. संपला, हे ओरडून सांगणाऱ्यासाठी '१९४२ लवस्टोरी' बद्दल मिळालेला फिल्मफ़ेअर (मरणोत्तर) पुरस्कार, हा तर एक शालजोडीतलाच होता.

आर. डी. हा एकच गाणे पुरुष व स्त्री गायकांकडून वेगवेगळ्याप्रकारे गाऊन घ्यायचा. उदा. 'हमे तुमसे प्यार कितना' त्याने किशोर व परवीन सुलताना यांच्या कडून गाऊन घेतले. 'जिंदगी के सफर में' या गाण्यातील बदलते ऋतू दाखविण्यासाठी इंटरल्युड म्युझिक वापरणारा पंचम, 'हम दोनो दो प्रेमी' मध्ये म्युझिशियनच्या संपावर तोडगा म्हणून इंटरल्युड म्युझिकच वापरत नाही. पंचमचा स्केल हा असा एका टोकापासून दुसऱ्या टोका पर्यंतचा असायचा.


आपले लाडके पंचमदा यांना ४ जानेवारी २०१४ ला जाऊन २० वर्ष पूर्ण होतील पण जेव्हा, त्यांचे एखादे गाजलेले गीत आपण ऐकतो तेव्हा जाणवते की पंचम म्हणत आहेत. . . 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैं!'







## ⁂ आये तुम याद मुझे गाने लगी हर धडकन ⁂



**सचिन देव बर्मन**. . . संगीत क्षेत्रातील एक लोभस, लडिवाळ राजकुमार; ज्याने आपल्या सुरांच्या व संगीताच्या बळावर  चित्रपटसंगीत विश्वात दिग्विजय साजरा केला. वडील त्रिपुरा राजघराण्याशी संबंधित असल्याने तसेही सचिन दा लौकिक अर्थाने राजकुमार होतेच. सचिन दा यांचा जन्मच मुळी राजघराण्यात झाल्यामुळे, एखादे क्षेत्र सहज, निर्विवाद पद्धतीने कसे पादाक्रांत करायचे  याचे बाळकडू  त्यांना जात्याच   मिळाले होते. त्यांना मी मेलडीचा राजा न म्हणता राजकुमार अशासाठी म्हणतो कि त्यांचे स्वर व संगीत नेहमीच तरुणाईचे प्रतिक ठरले. ' जलते है जिसके लिये' असे हळुवार प्रेम व्यक्त करणारा सुनील दत्त असो कि, 'दिल का भंवर करे पुकार' असे गाणारा देव आनंद सारखा समस्त तरुणींच्या स्वप्नामधील मदन असो;  या  सगळ्यांनाच सचिन दा यांचे संगीत, प्रेयसीवरचे प्रेम व्यक्त करताना  सोबत लागले

त्रिपुराच्या मातीचा सुगंध त्यांच्या संगीतामधून नेहमीच दरवळे पण तरीही वेळप्रसंगी 'पांच रुप्पैय्या बारा आना' सारखे अवखळ संगीतही त्यांच्या कडून ऐकू येत असे.



ज्यांचे  गाणे विड्यासारखे उत्तरोत्तर रंगत जायचे त्या सचिन दा यांना विडा खरोखरच प्राणप्रिय होता. ते आपला विडा कधीही कोणाशी शेअर करत नसत. जे वेड विड्याचे तेच वेड फुटबॉलचे देखील. मोहन बागानचे कट्टर चाहते असलेले सचिनदा त्या संघात मनाने एवढे गुंतलेले असायचे कि संघाचा पराभव झाल्यास ते पार उदास होत. एकदा



गुरुदत्तने अशाच वेळी सचिन दा यांना आनंदी मूड चे संगीत रचायला सांगितले. त्यावर त्यांचे उत्तर होते, "माझा संघ हरला आहे त्यामुळे या क्षणी पाहिजे तर एखादी दुःखी ट्यून बनवून देईन पण आनंदी ट्यून माझ्याने काही केल्या होणार नाही"

सचिन दा जसे फुटबॉल मध्ये गुंतलेले असायचे तद्वत सचिन दा यांचे चाहते त्यांच्या संगीतामध्ये! म्हणूनच त्यांच्या संगीताचे जबरदस्त चाहते असलेल्या सचिन तेंडूलकरच्या घरच्यांनी आपल्या घरातील नवीन मेम्बरचे नाव या संगीतकारावरूनच ठेवले.



किशोर याला सचिन दा यांनी आपला दुसरा मुलगाच मानले होते तरी देखील किशोर व रफी या दोघांना समान संधी देणारा संगीतकार म्हणून ते संगीत विश्वाला परिचित होते. असेच सुरेल संतुलन त्यांनी लता व आशाच्या बाबतीत देखील साधले. मिली चित्रपटाच्या दरम्यानच सचिन दा कोमात गेले. त्यांना भेटायला जेव्हा किशोर कुमार गेले तेव्हा त्यांनी सचिन दा यांना सांगितले कि काळजी करू नका तुमचे रेकोर्डिंग उत्तमपणे पार पडणार. पण मनात मात्र किशोर यांना ही आपली शेवटची भेट असावी असे वाटत होते. म्हणूनच कि काय आये तुम याद मुझे हे गाणे गाताना किशोरच्या मनात फक्त आणि फक्त बर्मनदा होते. सचिन दा आणि किशोरचे नाते फार जिव्हाळ्याचे होते. त्या सर्व भावना म्हणूनच या गाण्यातून व्यक्त झाल्या आहेत. अन्य संगीतकार जेव्हा रफी ला हाय पीच वाली गाणी देत असत तेव्हा सचिन दा प्रवाहाविरुद्ध जाऊन रफीला सॉफ्ट गाणी द्यायचे. आठवून पहा. . 'दिन ढल





जाये ' किंवा 'एक घर बनाउंगा' सारखी अविस्मरणीय गीते सचिन दा यांची एक खासियत होती. सकाळचा फेरफटका मारून घरी परतल्यावर ते ज्या गायकाचे गाणे रेकोर्ड करायचे आहे त्याला मुद्दामून फोन करत असत. उद्देश एवढाच कि आज त्याचा आवाज कसा आहे ते पारखण्यासाठी.

तुम्हाला आश्चर्य वाटेल कि ज्यांच्या कंठातून, 'वहा कौन है तेरा, मुसाफिर जायेगा कहा', 'सफल होगी तेरी आराधना', 'ओ रे माझी, … मेरे साजन है उसपार' सारखे अवीट सूर उमटले त्याच आवाजाला १९३३ मध्ये चक्क नाकारण्यात आले होते. यहुदी कि लडकी या चित्रपटातील गाणी आधी सचिन दा यांच्या आवाजात होती पण आयत्यावेळी ती पहाडी सन्याल यांच्या आवाजात परत रेकोर्ड करण्यात आली सचिन दा यांच्या गाण्यांचा अजून एक विशेष पैलू म्हणजे ते स्वतः नायक किंवा नायिकेसाठी कधीच गायले नाहीत. तर त्यांची गाणी पार्श्वभूमीला चालू असत व चित्रपटाची संपूर्ण कथाच त्या गाण्यातून पुढे प्रवाहित होत असे. आठवून पहा काही सिच्युअशन्स . . अमर प्रेम मधील हताश अवस्थेमध्ये सासरहून निघालेल्या शर्मिलावर चित्रित झालेले 'डोली में बिठाई के कहार ' किंवा भटीयाली लोकसंगीत सर्व प्रथम हिंदी चित्रपटामध्ये घेऊन येणारे 'सून मेरे बंधू रे' हे गाणे

सचिन दा यांनी कधीही वाद्यसंगीताला सुरांवर वरचढ होऊन दिले नाही. एकदा एका रेकोर्डिंगच्या वेळी त्यांच्या लक्षात आले कि एक अतिरिक्त वादक व्हॉयलिन वाजवत आहे. विचारणा केल्यावर त्यांना सांगण्यात आले कि आज त्या माणसाला मेहनताना द्यायचे आधीच ठरले होते म्हणून त्याचाही वापर केला जात आहे. त्यावर त्यांचे उत्तर होते . . त्याचे पैसे द्या, पण त्याला घरी पाठवा मला गाण्यात दोन नव्हे तर फक्त एकाच व्हॉयलिनची गरज आहे. सचिन देव बर्मन यांनी एकदा असेही म्हटले होते कि मला फक्त तबला, पेटी व लता द्या. मी केवळ या तीन गोष्टींवर अजरामर संगीत देऊ शकेन. तात्पर्य काय तर संगीतामध्ये वाद्यांपेक्षा शब्द काकणभर सरस असावेत असेच त्यांना वाटायचे. त्यांचा आपल्या संगीतशैलीवर प्रचंड विश्वास होता





म्हणूनच नायक एक पण त्याचा आवाज दरवेळी वेगवेगळा असाही प्रयोग त्यांनी खूप ठिकाणी केला. देव आनंद साठी कधी हेमंत कुमार तर कधी रफी तर कधी किशोर असे पर्याय त्यांनी वापरले गुरुदत्त, देव आनंद, हृषीकेश मुखर्जी व बिमल दा यांच्या बरोबर सचिन दा यांचे सूर अचूक जुळले. प्यासा, कागज के फुल, गाईड, प्रेम पुजारी, मिली, अभिमान, सुजाता, बंदिनी यादी न संपणारी आहे. देव ला देखील माहित होते कि सचिन दा शिवाय तो अपूर्ण आहे म्हणूनच गाईडच्या वेळी जेव्हा सचिन दा आजारी होते व त्यांनी जेव्हा देव आनंद यांना दुसरा संगीतकार घेण्यास सांगितले तेव्हा देव यांचे उत्तर होते . . नाही, तुम्ही बरे व्हा . . गाईड तुमच्यासाठी थांबेल सचिन दा यांच्यामुळे आग ओकणारा ऑक्टोबर महिना देखील सुसह्य झाला आहे. १ ऑक्टोबरचा जन्म तर ३१ ऑक्टोबरचा मृत्यू असा योग जुळून आल्याने ऑक्टोबर महिना म्हणजे सचिन दा यांच्या अवीट रचना ऐकण्याचा काळ असे समीकरण एफ एम वर जुळून येते. गुरुदत्त व किशोर यांचेही मृत्यू याच महिन्यातले. त्यामुळे सचिन दा यांचे या दोघांबरोबरचे कामही या निमित्ताने डोळ्यासमोर सहजच उभे रहाते.



आपला नोकर आपले संगीत न गुणगुणता इतरांचे संगीत गुणगुणतो हे पाहून अस्वस्थ होणारे व त्यावरून धडा घेऊन सामान्य माणसाच्या ओठी सहज रुळेल असे संगीत निर्माण करण्याचा ध्यास घेणारे सचिन दा यांना

सर्व चाहत्यांतर्फे मानाचा मुजरा. . !!





## हम तेरे प्यार में सारा आलम खो बैठे है



आयुष्यात काही गोष्टी या नेहमी जोडीनेच ओळखल्या जातात जसे कि हळद कुंकू, कृष्णार्जुन वगैरे वगैरे. संगीत क्षेत्रामध्ये देखील अशाच काही जोड्या नावाजल्या गेल्या ज्या आज ही रसिकांच्या हृदयामध्ये घर करून आहेत. त्यातील सर्वात लाडकी जोडी आहे ती **शंकर - जयकिशन** यांची.

शंकर सिंग रघुवंशी, चार चौघांसारखा संगीत क्षेत्रामध्ये काही तरी करून दाखविण्याच्या ध्येयाने पछाडलेला तरुण! तबला मस्त पैकी वाजवू शकणारा; काही तरी, कुठेतरी ब्रेक मिळेल या आशेने गुजराथी दिग्दर्शक चंद्रवदन भट्ट यांच्याकडे सतत येराझरा घालणारा एक होतकरू कलाकार! तिथेच त्याची भेट होते हार्मोनियम उत्कृष्टपणे वाजवू शकणाऱ्या जयकिशन पांचाल या अजून एका होतकरू कलाकाराशी

एखाद्या सुंदर गाण्याला सजविण्यासाठी आपल्या भारतीय संगीतामध्ये तबला व पेटीची साथ पुरेशी असते; म्हणूनच कि काय नियतीने या तबला व पेटी वाजवणाऱ्या दोघांना एकत्र आणले. शंकरने पृथ्वी थिएटर मध्ये आपल्यासोबत जयकिशनला पण काम करून द्यावे अशी विनंती पृथ्वीराज कपूर यांना केली. आणी इथेच शंकर जयकिशन यांची ओळख मग राज कपूर शी झाली. राजने 'आग' नावाचा चित्रपट काढला होता, ज्याचे संगीत राम गांगुली यांनी दिले होते. याच गांगुली यांना शंकर जयकिशन नी सहाय्यक म्हणून साथ दिली होती.





पण राजच्या दुसऱ्या चित्रपटाच्यावेळी अघटीत घडले. 'बरसात' चित्रपटासाठी राज ला गांगुली यांची एक धून खूप आवडली होती पण त्याचवेळी राजला बातमी मिळाली कि हीच धून गांगुली त्यांच्या दुसऱ्या एका चित्रपटासाठी वापरणार आहेत. मनस्वी राज दुखावला गेला व त्याने गांगुली यांच्या ऐवजी शंकर जयकिशन ला संधी देण्याचे ठरविले

**'छोड गये बालम'**, **'हवा में उडता जाये मेरा लाल दुपट्टा मलमल का'** या गाण्यांनी रसिकांना जणू पहिल्या वहिल्या वळीवाच्या पावसात न्हाऊन निघण्याचा आनंद प्राप्त करून दिला. शंकर जयकिशन या संगीतकारांना बरसातच्या वेळी गीतकारांची एक जोडी मिळाली. ती जोडी होती हसरत जयपुरी व शैलेंद्र यांची. हे चौघे व राज कपूर या पंचकाने मग पुढील काही वर्षे सूर व ताल यांची रंगपंचमीच खेळली - बरसात, आवारा, चोरी -चोरी, श्री ४२०, अनारी ही यादी जरी नुसती आठवली कि आपल्यासारखे दर्दी कानसेन तृप्त होऊन जातात

शंकर जयकिशन यांच्या संगीताची जादू इतकी अद्भुत होती कि भल्या भल्यांना त्याची मोहिनी पडली होती. दिग्दर्शक मेहबूब यांना 'चोरी चोरी' सिनेमातलं, शंकर-जयकिशन यांनी संगीतबद्ध केलेलं आणि लता मंगेशकर यांनी गायलेलं **'रसिक बलमा. . .** ' हे गाणं फार आवडायचं. त्यांना एकदा एका ऑपरेशनसाठी लंडनला जावं लागलं. ऑपरेशनच्या आदल्या रात्री मेहबूब फार बेचैन झाले. शस्त्रक्रियेदरम्यान वाचू की मरू, असे त्यांना वाटायला लागले. शेवटची इच्छा म्हणून लताने गायलेलं हे गाणं त्यांना ऐकावंसं वाटू लागलं. त्या अवस्थेत न राहवून त्यांनी रात्री १२ वाजता भारतात लताला फोन करून आपली मन:स्थिती सांगितली आणि हे गाणं ऐकवण्याची दीदींना विनंती केली. दिदींनी देखील परिस्थितीचे गांभीर्य जाणले आणि रात्री बारा वाजता, भारतातून लंडनला फोनवर हे गाणं त्यांनी मेहबूब यांना गाऊन दाखवलं.





शंकर -जयकिशन यांचा आवडता राग भैरवी होता. या रागाला ते 'सदा सुहागन' राग म्हणत. त्यांची अनेक गाणी जशी कि. . **‘सब कुछ सिखा हमने’, ‘मेरा जुता है जपानी’** याच रागावर आधारित आहेत. त्यांची शास्त्रीय संगीताची बैठक किती पक्की होती ते 'बसंत बहार' मधील गाणी ऐकून लक्षात येते. **'मै पिया तेरी तू माने या ना माने**' या गाण्यात जणू दोन गायिका जुगलबंदी करत होत्या एक लता दीदी तर दुसरी पन्नालाल घोष यांची बासरी. बासरीच कशाला, प्रत्येक वाद्य कसे व कुठे वापरायचे याचे त्यांना नेमके भान होते. खरेतर शंकर जयकिशन त्यांच्या अनोख्या वाद्यवृंदासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या वाद्यवृन्दामध्ये एकाच वेळी ५० पेक्षा जास्त व्होयलीन वादक असायचे. कॉर्ड चा सर्वप्रथम उपयोग चित्रपट संगीतामध्ये करण्याचा मान याच जोडीला जातो. वाद्य वृंदाच्या विशालतेमुळे व सुरांच्या श्रीमंती मुळेच त्यांच्या बहुतेक गीतांमध्ये तीन वैशिष्ट्ये हमखास दिसून यायची एक; गाणे चालू होण्यापूर्वी वाजणारे संगीत म्हणजे प्रील्युड, दुसरे, गाण्याच्या मुखड्यानंतर येणारा संगीताचा पीस म्हणजे इंटरल्यूड व तिसरे गाणे संपल्यावर देखील वाजणारे संगीत म्हणजे एपिलॉग

प्रत्येक कडव्याआधी वेगवेगळे इंटरल्युड वापरण्याएवढे कौशल्य त्यांच्याकडे होते. शंकर जयकिशन हे स्वतंत्रपणे वेगवेगळ्या गीतांना स्वरसाज चढवायचे पण त्यांच्यातील अलिखित समझोत्यानुसार कोणी कोणत्या गीताला संगीत दिले हे जगाला उघड केले जायचे नाही. पण असे म्हणतात की शंकर यांना गीतकार शैलेंद्रच्या रचनांना तर जयकिशन यांना हसरत जयपुरी यांच्या रचनांना संगीत देण्यास विशेष आवडायचे. कधी कधी शंकर व जयकिशन हेच एकमेकांचे स्पर्धक असायचे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'हरियाली और रास्ता' या चित्रपटाचे शीर्षक गीत. शंकर यांनी **'बोल मेरी तकदीर में क्या हैं, मेरे हमसफ़र अब तो बता जीवन के दो पहलू हैं, हरियाली और रास्ता'** असे गाणे तयार केले तर जयकिशन यांनी बनविले होते, **'ये हरियाली और ये रास्ता'**. दोन्ही गाणी इतकी अवीट होती कि चित्रपट निर्मात्याने ही दोन्ही गाणी





आपल्या चित्रपटामध्ये समाविष्ट केली. पण शंकर हे जयकिशन यांना सिनिअर असल्याने तेच जयकिशन यांच्या गाण्यांसाठीसुद्धा वाद्यवृंद योजना ठरवायचे. दोघांमधील उत्कृष्ट समन्वयामुळेच या जोडीने तब्बल नऊ वेळा फिल्मफेअरचा उत्कृष्ट संगीतकाराचा पुरस्कार मिळविला; १९६० ते १९६३ या चार वर्षांमध्ये त्यांना तीनवेळा हा पुरस्कार मिळाला होता. . 'अनारी', 'दिल अपना और प्रीत परायी' व 'प्रोफेसर' या चित्रपटांसाठीही अनोखी कामगिरी होती. पण या यशाचा कळस तर पुढे होता; १९७१ ते १९७३ अशी सलग तीन वर्षे हा पुरस्कार त्यांच्या झोळीत आला

शंकर हे खूप दर्दी कलावंत होते. पतिता चित्रपटातील एक गाणे, **'किसीने अपना बनाके मुझको मुस्कुराना सिखा दिया'** हे गाणे त्यांच्या लाडक्या लताने खूप मन लावून गायले. आपल्या चालीला सुंदर स्वरांचे कोंदण लाभलेले पाहून शंकर यांनी खुश होऊन तिथल्या तिथे १०० ची नोट लताला बक्षीश म्हणून दिली शंकर स्वतः परफेक्टशनिस्ट होते. हैद्राबाद मध्ये एकदा रस्त्यावरून जात असताना त्यांना एका तवायफच्या कोठ्यावरून एका तबलजीच्या वाजवण्याचे ताल ऐकू आले. तो तबलजी चुकीचे वाजवत आहे हे ऐकल्यावर शंकरजी कसलीही तमा न बाळगता कोठ्यावर गेले व तबलजीला त्याची चूक दाखवून देऊ लागले. जेव्हा शंकरजी यांनाच माझे चुकत असेल तर तू वाजवून दाखव ना असे आव्हान तबलजी कडून मिळाले तेव्हा शंकर यांनी तिथल्या तिथे योग्य ताल वाजवून सर्वांची बोलतीच बंद करून टाकली







जयकिशन देखील काय कमी दर्दी नव्हते. चर्चगेट चे गेलोर्ड हॉटेल म्हणजे जयकिशन यांचा अड्डा होता. मदन मोहन यांनी संगीत दिलेले संजोग चित्रपटामधील 'वो भुली दास्तान लो फिर याद आ गई' हे गाणे त्यांना पहिल्याच क्षणी इतके आवडले होते कि ते ऐकल्यावर सकाळची वाट न बघता त्यांनी रात्री दोन वाजताच गेलोर्ड मधून मदनमोहन यांचे दूरध्वनी वरून अभिनंदन केले होते. रसिकांचे शंकर जयकिशन यांच्यावर अतोनात प्रेम होते म्हणूनच जेव्हा जयकिशन यांचे निधन झाले तेव्हा हॉटेल गेलोर्डच्या व्यवस्थापनाने पुढचा एक महिना जयकिशन बसत ते टेबल ' जयकिशन यांच्यासाठी खास आरक्षित' असे लिहून एक आगळी वेगळी श्रद्धांजली पेश केली होती  २६ एप्रिल, शंकर यांचा स्मृती दिन. खरेतर आज फक्त त्यांच्यावरच लिहिले असते तर तो त्यांच्यावर अन्यायच केल्यासारखे झाले असते कारण आपला जिवलग जयकिशन हे जग सोडून गेल्या नंतर देखील त्यांनी स्वतंत्रपणे जे चित्रपट केले ते शंकर जयकिशन या जोड नावानेचशंकर जयकिशन यांची एक से एक गाणी निवडताना रसिकांची त्या लहान मुलासारखी अवस्था होते ज्याला गोळयांच्या बरणीमध्ये हात घालून जास्तीत जास्त गोळया एकाचवेळी मुठीत घ्यायच्या असतात **'दिल के झरोके में तुझको बिठाकर'**, **'तेरा जलवा जिसने देखा'**, **'क्या करू राम मुझे बुढ्ढा मिल गया'**, **'ये रात भिगी भिगी' ' मेरे सपने में आना रे'** वेगवेगळया मूड मधील ही गाणी ऐकली कि शंकर जयकिशन अजून काही वर्षे आपल्यासोबत असावे असे रसिकांना वाटणे साहजिक आहे. म्हणूनच या दोघांच्या विरहामध्ये झुरणारे अस्सल रसिक म्हणतात,

**'हम तेरे प्यार में सारा आलम खो बैठे है'**








## 'वो जब याद आये बहोत याद आये'



लक्ष्मीकांत प्यारेलाल... शंकर जयकिशन, कल्याणजी आनंदजी यांच्याप्रमाणेच गाजलेली अजून एक संगीतकार जोडी! पण ही जोडी रसिकांचे अमाप प्रेम मिळाल्याने सर्वाधिक काळ प्रसिद्धीच्या शिखरावर विराजमान होती सुरील कला केंद्र या मंगेशकर घराण्याने चालविलेल्या अकादमीमध्ये लक्ष्मी व प्यारे एकमेकांना प्रथम भेटले. अल्पावधी मध्येच त्या दोघांमध्ये ऋणानुबंध निर्माण झाले. दोघही तरुण होतकरू, प्रतिभावान होते पण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीशी झगडत होते. म्हणूनच की काय लता जी यांनी या दोघांवर विशेष माया दाखवत त्यांची भेट सी. रामचंद्र, नौशाद, सचिन देव बर्मन अशा दिग्गजांशी घालून दिली.

म्युझिक अरेंजर म्हणून सचिन देव बर्मन यांच्या बरोबर एल. पी. यांनी जिद्दी चित्रपट केला तर राहुलदेव बर्मन यांच्या बरोबर छोटे नवाब. आर डी व एल पी यांची मैत्री जमली ती अशी. त्यामुळेच कि काय **दोस्ती** चित्रपटातील सर्व गाजलेल्या गाण्यांसाठी एल पी यांच्यासाठी माउथऑर्गन वाजवला ते आर डीने.



'चाहूँगा मैं तुझे सांज सवेरे' 'राही मनवा दुख कि चिंता' सारख्या सुरेल गाण्यांमुळे एल पी यांना पहिले फिल्मफेअर पारितोषिक मिळाले

पण ह्या जोडीचा प्रदर्शित झालेला पहिला चित्रपट होता '**पारसमणी**'. खूप कमी जणांना ठावूक आहे कि पारसमणी आधी त्यांनी संगीत दिलेला एक चित्रपट प्रदर्शितच झाला



नाही. पण अपयश हीच तर खरी यशाची पहिली पायरी असते. 'हँसता हुआ नुरानी चेहरा', 'वो जब याद आये बहोत याद आये', 'ऊईमा ऊईमा ये क्या हो गया' या सारख्या गाण्यांनी त्यांनी अवघ्या चित्रपट सृष्टीचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते कारकीर्दीच्या पहिल्या टप्प्यावर लक्ष्मीकांत मेंडोलीन वाजवायला शिकले तर प्यारेलाल व्हॉयलिन . प्यारेलाल यांना व्हॉयलिन शिकविणाऱ्या गुरूचे नाव होते एन्थोनी गोन्स्लावीस. आपल्या गुरूला आगळी वेगळी सलामी देण्यासाठी या संगीतकार जोडीने **'अमर अकबर एन्थोनी'** या चित्रपटामध्ये अमिताभच्या तोंडी एक धमाल गाणे रचले. गाणे होते अर्थातच, 'माय नेम इज एन्थोनी गोन्स्लावीस. ' तसे लक्ष्मीकांत देखील कालांतराने व्हायलीन वाजवायला शिकले होते पण त्यांचे गुरु होते हुस्नलाल (हुस्नलाल भगतराम संगीतकार जोड़ी). आपल्या संगीत कारकिर्दीला हातभार लावणाऱ्या लताजी व रफी यांच्याबद्दल एल. पी. यांच्या मनात खूप आदरभाव होता. आपले संगीत जर एक आणा असेल तर त्याचे रुपांतर सोळा आण्यात करायचे श्रेय लता दीदीला आहे असे ते सर्वांना सांगत.

**छैला बाबू** मधील तेरे प्यार ने मुझे गम दिया हे रफी व एल पी कॉम्बिनेशनचे पहिले गाणे होते पण ते पडद्यावर आले खूप उशिरा म्हणजे ५ -६ वर्षांनी. हे गाणे रेकोर्ड करताना एल पी यांच्याकडे रफी सारख्या दिग्गज गायकाला द्यायला फक्त १००० रुपये होते. मोठ्या संकोचाने ते पैसे एल पी यांनी रफी यांना दिले. पण रफी देखील मोठ्या मनाचे होते त्यांनी प्रत्येकी ५०० रुपये लक्ष्मीकांत व प्यारेलाल यांना आपले आशीर्वाद म्हणून परत केले. 'चाहूँगा मैं तुझे सांज सवेरे' हे गाणे खरे तर दोस्ती चित्रपटामधून वगळण्याचे एल पी यांनी ठरविले होते. पण रफीजी यांच्या सांगण्यावरून त्यांनी आपला निर्णय फिरविला. पुढे याच गाण्यासाठी मजरूह सुलतानपुरी (गीतकार), रफी (गायक) व एल पी (संगीतकार) असे एक नाही तर तब्बल तीन फिल्म फ़ेअर पुरस्कार मिळाले व एक इतिहास घडला.





‘दर्दे दिल दर्दे जिगर’ सारख्या गझल ला डिस्को टाईप म्युझिक मध्ये सजवायचे अनोखे काम या जोडीने कर्ज या चित्रपटाच्या वेळी केले. पण हे ही तितकेच खरे कि व्यावसायिक तडजोड म्हणून 'एक हसीना थी' ची चाल त्यांनी चक्क इंग्लिश गाणे 'वुई एज लव (जॉर्ज बेन्सन) यावर बेतली होती. एल पी यांनी सतत चार वर्षे फिल्मफेअर जिंकले होते त्यात **कर्ज** चा नंबर चौथा होता. 'अमर, अकबर, एन्थोनी', **'सत्यम, शिवम, सुंदरम'** व **'सरगम'** हे पहिले तीन पुरस्कार प्राप्त चित्रपट होते

एल पी यांनी आपल्यावर केल्या गेलेल्या उपकारांची फेड जमेल तशी केली. आर डीने आपल्या ‘दोस्ती’ चित्रपटामध्ये माउथ ऑर्गन वाजवला म्हणून त्याची परतफेड म्हणून १९८२ सालच्या आर डी चे संगीत असलेल्या 'तेरी कसम' चित्रपटामध्ये 'दिल की बात कहीं लबपे ना आ जाये ' मध्ये लक्ष्मीकांत यांनी पाहुणा कलाकार म्हणून काम केले.



तर राजेश खन्ना, किशोर कुमार, आर डी यांचा झंजावात जेव्हा रफी साहेबांना साईड लाईन करत होता तेव्हा एल पी यांनीच रफी यांना भक्कम आधार दिला. रफी यांनी सर्वाधिक गाणी एल पी यांच्यासाठीच गायली आहेत ते काही उगीचच नाही. रफी कशाला लता दीदी देखील सर्वात जास्त गायल्या ते एल पी यांच्यासाठीच आपल्या नेहमीच्या लाडक्या एस जे ना बाजूला सारत जेव्हा राज कपूर यांनी एल पी यांना **बॉबी** साठी संधी दिली तेव्हा एल पी व आनंद बक्षी यांना ते एक मोठे आव्हानच वाटले. लक्ष्मीकांत यांचा तयार होणारा पारसमणी बंगला बघण्यासाठी आनंद बक्षी त्यांच्या घरी गेले होते. तेथूनच गीतकार व संगीतकारजोडी आर. के. स्टुडियो ला जाणार होते. पारसमणी बंगल्यातील अनेक खोल्या, दारे बघून आनंद बक्षी यांना तो बंगला म्हणजे भूल भुलैय्याच वाटला होता.





ई साहित्य प्रतिष्ठान

राजकडे भेटायला जायचे तर रिकाम्या हाती न जाता एक गाणे व धून घेऊनच जावे असे बक्षी व एल पी यांना मनापासून वाटत होते. नुकताच पाहिलेला भूल भुलैय्या आठवून आनंद बक्षी यांना बोल सुचले; 'हम तुम एक कमरे में बंद हो और चाबी खो जाये' एल पी यांनी लगेच या बोलांना चाल लावून राज कपूर यांचे मन पहिल्याच भेटीत जिंकून घेतले. बॉबी चित्रपटामध्ये खरे तर या गाण्यासाठी सिच्युएशन नसताना देखील राज कपूर यांना ते गाणे आवडल्याने, त्यांनी तशी सिच्युएशन निर्माण केली. एल पी यांची जादूही अशी होती लक्ष्मीकांत व प्यारेलाल म्हणजे दो जिस्म एक जान असे असल्याने आजच्या लेखात या दोघांचे योगदान रसिकांपुढे ठेवण्याचा मोह आवरता आला नाही.

ते लक्ष्मीकांतच होते ज्यांनी प्यारेलाल यांना झुबीन मेहता यांच्याबरोबर वेस्टर्न म्युझिक बॅण्डमध्ये जाण्यापासून रोखले होते. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्यामध्ये इतके भावनिक बंध होते की लक्ष्मीकांत, प्यारेलाल यांना नेहमीच गंमतीने सांगायचे कि तुझ्या नावाची नेमप्लेट कधीच बनवू नकोस कारण त्यामध्ये प्यारेलाल नावापुढे लक्ष्मीकांत नाव असणार नाही. लक्ष्मीकांत यांचा जन्म दिवाळीतील लक्ष्मी पूजनाच्या दिवशीचा! त्यामुळेच त्यांचे नाव लक्ष्मीकांत ठेवले गेले. लक्ष्मीकांत मधील लक्ष्मी (पैसा) व प्यारेलाल मधील प्यार (रसिकांचे प्रेम) ह्या दोन्ही गोष्टी या जोडीला ३५ वर्षे भरभरून मिळाल्या

२५ मे लक्ष्मीकांत यांचा स्मृतिदिन. 'एक दो तीन', 'चोलीके पीछे क्या है' सारखी ठेका ठरायला लावणारी गाणी असोत की 'सावन का महिना' सारखी हळुवार गीते असोत ह्या जोडीने बिनाका गीतमालेवर व रसिकांच्या हृदयावर सदोदित राज्य केले आहे. त्यामुळे २५ मे फक्त निमित्त आहे. रसिकांच्या लेखी मात्र 'वो जब याद आये बहोत याद आये' अशीच काहीशी भावना प्रतिदिन असते.





# 'कहीं दूर जब दिन ढल जाए'




सलिल चौधरी... हिंदी चित्रपट सृष्टीतील एक अजब रसायन !! सलिल चा अर्थ होतो पाणी. पाणी हे जीवनाचे प्रतिक आहे. पाणी ज्याला कसल्याही सीमा नसतात, पाणी जे आपल्या प्रवाहात येणाऱ्या कोणालाही आपल्या सोबत वहावात जायला प्रवृत्त करते. अगदी सर्व हेच विशेष सलिल दा यांच्या संगीतामध्ये आपण अनुभवू शकतो
सलिल दा यांचे संगीत रसिकांना सुरांच्या, संगीताच्या विश्वात अलगद पणे वहावत नेते ; एखाद्याने लाख प्रयत्न करून पहावेत तरीही तो त्यांच्या संगीताच्या भोवऱ्यामध्ये १०० % गुरफटून जाणारच. त्यांचे संगीत कोणत्याही सीमांमध्ये बंदिस्त नव्हते त्यामुळे ते कधी पाश्चिमात्य वाटते तर कधी अस्सल भारतीय मातीतील लोकसंगीत !!
१९ नोव्हेंबर ला जन्मलेल्या सलिल दा यांच्यावर लहानपणापासूनच संगीताचे संस्कार नकळत घडत गेले. वडिलांकडे असलेला पाश्चिमात्य संगीताचा ठेवा व आसामच्या जंगलांमध्ये, चहाच्या मळ्यांवर ऐकू येणारे निसर्गाचे संगीत व लोक संगीत हे त्यांचे संगीतातील तीन गुरु होते. त्यामुळे सलिल दा यांच्या काही रचना इंग्लिश गाण्यांवरून बेतल्या होत्या तर काही रचनांमध्ये त्यांनी पक्ष्यांची किलबिलाट, गुरांचे हंबरणे, रानातील चित्र विचित्र आवाज यांचा सुरेल ताळमेळ घातला होता





बंगाली चित्रपट सृष्टीमध्ये पोरीबर्तन (परिवर्तन )या चित्रपटामधून पदार्पण करणारे सलिल दा बंगाली संगीतामध्ये पुढे जाऊन  आमुलाग्र परिवर्तन करतील याची त्यावेळी  कोणालाही पुसटशी कल्पना नव्हती. हिंदी चित्रपट सृष्टीमधील सलीलदा यांचे पदार्पण देखील असेच दमदार होते. दो बीघा जमीन मधील त्यांचे एक एक गाणे म्हणजे पाणीदार मोती होते

'दो बीघा जमीन' हिंदी मध्ये प्रदर्शित झाला तर  त्याची बंगाली आवृत्ती, 'रिक्षावाला' या नावाने प्रदर्शित झाली. या चित्रपटांची पटकथा सलिल दा यांचीच होती. या चित्रपटाचीच कशाला परख या चित्रपटाची पण कथा त्यांचीच होती. सलिल दा अष्टपैलू होते. ते बासरी, पियानो व व्हॉयलिन उत्तम प्रकारे वाजवत. 'जारे उड जारे पंछी' मध्ये बासरीचा उपयोग त्यामुळेच त्यांनी चपखलपणे केला

अत्यंत प्रभावी पार्श्वसंगीत देऊन वातावरणनिर्मिती करण्यात  देखील ते कुशल होते आणि अनेक लघुपटांमध्ये व मालिकांमध्ये त्यांच्या या कौशल्याचा वापर करण्यात आला होता. त्यासाठी ते किती खोलवर विचार करत असत, विशिष्ट परिणाम साधण्यासाठी कोणत्या वाद्याचा कसा उपयोग करून घेत असत याबद्दल एक किस्सा प्रचलित आहे. एकदा काय झाले पार्श्वसंगीतासाठी त्यांना  सरकारकडून मंजूर झालेले बजेट खर्च होऊन गेले होते. पण त्यानंतरसुद्धा त्यांनी एका विशिष्ट प्रसंगासाठी आपल्या खर्चाने वादकाला बोलावून घेऊन त्यांच्या मनातले सनईचे सूर वाजवून घेतलेच. सलिल चौधरी यांचे पार्श्वसंगीत इतके लोकप्रिय झाले होते की कानूनसारख्या गाणी नसलेल्या चित्रपटाचे पार्श्वसंगीत दिग्दर्शन आवर्जून त्यांना दिले गेले.  दरवेळी आपण देत असलेले  संगीत हे आपल्या आधीच्या संगीतापेक्षा अगदी वेगळे असावे  म्हणजेच 'unpredictable' असावे असा त्यांचा कटाक्ष असे.



लता मंगेशकर व मन्ना डे यांच्या आवाजात 'हरियाला सावन ढोल बजाता आया' हे गाणं रेकॉर्ड करताना सलीलदा यांनी  वैचित्र्यपूर्ण कोरसचा कल्पक वापर करून धमाल उडवून दिली होती. “बाग में कली खिलि भंवरा नहीं आया” या गाण्यामध्ये इन्टरल्यूड



चा वापर हा त्यांच्या कल्पकतेचा अजून एक नमुना. त्याच प्रमाणे आपल्या हिंदी चित्रपटांच्या संगीतामध्ये सांचारीचा उपयोग करणे हे देखील त्यांच्या वैविध्यपूर्णतेचे प्रतिक होते सलिल दा यांच्या संगीताचे विशेष म्हणजे सो कॉल्ड जीनियस गायकांचा त्यांच्याकडे कस लागायचा तर साधारण म्हणून हिणवला गेलेला गायक त्यांच्या कडे ऐतिहासिक कामगिरी करायचा. गायक मुकेश बद्दल खूप संगीतकारांचे चांगले मत नव्हते . त्याच्या रेंज बद्दल संगीतकार नेहमीच साशंक असायचे पण सलिल दा यांनी त्याच मुकेश कडून "सुहाना सफ़र और ये मौसम हसीं", "कई बार यूं भी देखा है", "नैन हमारे सांझ सखा रे", "कहीं दूर जब दिन ढल" "मैने तेरे लिये ही सात रंग के सपने चुने"सारखे अप्रतिम काम काढून घेतले. या उलट किशोर ला "गुजर जाए दिन" या गाण्यासाठी १७ रिटेक द्यावे लागले.



लता शिवाय सलिल चौधरी हे खुद्द सलिल दा यांनाच मान्य नव्हते. या जोडीची सुरुवात झाली ते मधुमती मधील 'आजा रे परदेसी' या गाण्यापासून. लता दीदी यांना पहिला फिल्म फ़ेअर पुरस्कार मिळाला ते याच गाण्यासाठी. खरे तर हे गाणे बिमल दा चित्रपटामधून काढूनच टाकणार होते कारण या गाण्यासाठी आवश्यक ती सिच्युएशन त्यांना मिळतच नव्हती. पण सलिल दा यांनी आग्रह केला आणि पुढचा इतिहास रसिकांना ठावूकच आहे. त्याचप्रमाणे आनंद चित्रपटामध्ये स्त्री पात्रासाठी गाण्याची सिच्युएशन नव्हतीच पण सलिल दा म्हटले कि लता पाहिजेच. त्याचमुळे आयत्यावेळी एक गाणे लतासाठी लिहिण्याचे ठरले. पण हृषी दा व सलिल दा यांनी घाई घाई मध्ये या गाण्यासाठी नजरचुकीने योगेश व गुलजार दोघांना गाणे लिहिण्यास सांगितले. पण गुलजारचे बोल योगेश पेक्षा सरस ठरले व त्यामुळे





गुलजारच्या गाण्याची वर्णी लागली. “ना जिया लागे ना ” हे गुलज़ार यांनी लिहिलेले गाणे, सलिल दा व लता या जोडीचे अजून एक अविस्मरणीय गीत ठरले ते अशा प्रकारे. 'कहीं दूर जब दिन ढल जाए' हे गाणे मग योगेश यांच्या कडून लिहून घेण्यात आले. . अशाप्रकारे सलिल दा व हृषी दा या जोडीने दोन्ही गीतकारांचा योग्य तो सन्मान राखला हाफ तिकीटच्या गीत मुद्रणाच्या वेळी सलिल दा यांची लाडकी लता येऊ शकली नाही व त्याच वेळेला किशोर कुमारने केलेला आग्रह देखील सलिल दा मोडू शकले नाहीत. पण यातूनच एक अफलातून गाणे जन्माला आले. . 'आके सीधी लगी दिल पे'; ज्यात किशोर मेल व फीमेल दोन्ही आवाजात गायला सलिल दा यांना संगीताची प्रेरणा कधीही मिळायची. पावसामध्ये कार चालवताना वायपरच्या लयबद्ध आवाजामुळे त्यांना कधी तरी चाल सुचायची तर कधी काठमांडूच्या हॉटेल मध्ये वास्तव्याला असताना रात्री गस्तीवर असलेल्या चौकीदाराचे गुणगुणे ऐकून. "छोटा सा घर होगा" या गाण्याचे असे काही नेपाळी कनेक्शन असेल हे ऐकून आश्चर्य वाटते ना ! “मिडल ऑफ़ द रोड” म्हणून ओळखलेल्या "रजनीगंधा", “छोटी सी बात” या सारख्या चित्रपटांच्या रुपेरी यशामध्ये सलिल दा यांच्या संगीताचे मोठे योगदान आहे. येशुदास ला प्रस्थापित करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा होता. संगीतकार रवि प्रमाणेच सलिल दा यांचे देखील मल्याळम भाषेत मोलाचे योगदान आहे सलिल दा संगीताचे एक चालते बोलते विद्यापीठच होते म्हणूनच 'जागते रहो'च्या 'जागो मोहन प्यारे' या गाण्याच्या रेकोर्डिंग च्या वेळी राज कपूरने शंकर जयकिशन या आपल्या जोडगोळीला सलिल दा संगीत कसे देतात हे पाहायला बोलाविले होते सलिल दा यांना आधी चाल देऊन त्यात शब्द घालायला खूप आवडत असे कारण त्यांना आपल्या चालीमध्ये चेंजेस करायला फारसे आवडत नसे. पण इतके मात्र खरे कि त्यांनी संगीत क्षेत्रामध्ये खूप काही चेंजेस केले त्यामुळेच जेव्हा जेव्हा 'कहीं दूर जब दिन ढल जाए'. . . असे सूर ऐकू येतात तेव्हा सलिल दा तुमची आठवण फिरून फिरून येते .... . !!





# शापित गंधर्व मदन मोहन



कथा, पुराणांमध्ये आपण शापित गन्धर्वांबद्दल नेहमीच ऐकत आलो आहोत पण हिंदी चित्रपटसंगीत क्षेत्रात देखील असाच एक शापित गंधर्व होऊन गेला आणि त्याचे नाव आहे संगीतकार स्वर्गीय मदन मोहनजी. मदनमोहन यांच्या इतका दैवी प्रतिभेचा संगीतकार क्वचितच जन्माला येतो, पण हे ही तितकेच खरे की त्यांच्या इतकाच उपेक्षित संगीतकार देखील चित्रपटसृष्टीने पहिलेला नाही. साक्षात लताजींनी ज्यांना'गझलोंका शहजादा' असा किताब दिला, ज्यांच्या रचना गाण्यास गान सरस्वतीला आव्हानात्मक, अवघड वाटल्या, ज्यांच्या बरोबर वारंवार गाण्याची इच्छा आशा ताईना व्यक्त करावीशी वाटली अशा मदनजींना एकही फिल्मफ़ेअर पुरस्कार मिळू नये या सारखे दुसरे दुर्दैव ते कोणते असू शकते?
इतरांच्या मतभेदाचा फटका मदन मोहनजींना एकदा नाही तर दोनदा खावा लागला. १९५६ मधील **'भाई भाई'** हा चित्रपट मदनमोहनजींचा पहिला हिट चित्रपट सलग २४ आठवडे चित्रपट गृहामध्ये झळकल्यावर अचानक प्रोड्यूसर (निर्माते) व डिस्ट्रीब्युटर (वितरक) यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यामुळे मदन मोहनजींच्या आयुष्यातील पहिली रजत जयंती मात्र एक पाऊल दूरच राहिली. दुसरा प्रसंग **'मेरा साया'**च्या वेळचा होता.



१९६६ मधील फिल्म फ़ेअरच्या नामांकनांमध्ये मेरा सायाचे नाव होते. पण आयत्यावेळी मॅगझीन व अवार्ड पॉलिसी बद्दल मतभेद उफाळून आल्याने मेरा सायाच्या



जागी दो बदन या राज खोसलांच्याच दुसऱ्या चित्रपटाची वर्णी लागली. मेरा सायाचे फिल्म फ़ेअर चुकले पण याच चित्रपटातील **'नैनो में बदरा छाये** ' या गाण्याबद्दल मदनमोहन यांना पुढे जाऊन सिने म्युझिक डायरेक्टर अवार्ड व सूरसिंगार संसदचे अवार्ड मिळाले.

मदनमोहनजींना बऱ्याचदा पहिल्या प्रयत्नांमध्ये अडथळयांचा सामना करावा लागला. १९५० मध्ये **'आँखें''** चित्रपटासाठी मदनमोहन यांना लताजींचा आवाज हवा होता. पण काही हितशत्रूंनी गैरसमज करून देल्याने लताजींनी मदनमोहनजीं बरोबर काम करण्यास नकार दिला पण नंतर मात्र **'मदहोश'** मध्ये लताजींनी जो मदनमोहनजींचा हात पकडला तो पुढे कधीच सोडला नाही. लताजींना या गंधर्वाची पारख लवकर झाली हे आपल्या सारख्या कानसेनांचे भाग्यच म्हणायचे.
**'लग जा गले'** सारखे अजरामर गाणे पहिल्या प्रयत्नात राज खोसला यांनी रिजेक्ट केले होते. पण आपल्या रचने बद्दल प्रचंड आत्मविश्वास असलेल्या मदनजींनी हे गाणे मनोजकुमारना ऐकवले. मनोजकुमार या गाण्याच्या प्रेमातच पडले व त्यांनी राज खोसला यांना परत एकदा तेच गाणे नीट ऐकण्याची विनंती केली. यावेळी राज खोसला ओशाळले, त्यांना कळेचना कि ही स्वर्गीय रचना आपण पहिल्यांदा नाकारलीच कशी? **'नैना बरसे रिमझिम'** ही चाल मदनमोहन यांनी १९५२ मध्ये रचली होती. पण अनेक फिल्म निर्मात्यांनी या चालीला वाळीत टाकले होते. पुढे जेव्हा **'वो कौन थी'** साठी राज खोसला यांनी ही चाल ऐकली तेव्हा ते त्यावर तुटून पडले. पुढचा इतिहास मग आपल्या सर्वांना माहीतच आहे. ख्यातनाम गायिका सुरैय्या यांना शोधून काढले ते याच गुणी संगीतकाराने, भूपेंद्रला स्क्रीनवर गायक म्हणून ब्रेक दिला ते मदनमोहन यांनीच. पण हे सर्व आज किती जणांना ठाऊक आहे?





मदनमोहन यांना अनेकदाअग्नी परीक्षेला तोंड द्यावे लागले. **‘लैला मजनू’**साठी मदनजींना रफीचा आवाज हवा होता तर डायरेक्टर रवैल यांना किशोरचा. रफीसाठी प्रसंगी चित्रपट सोडण्याची मदनमोहन यांची तयारी होती. शेवटी रवैल यांना मदनमोहन यांचे म्हणणे ऐकावेच लागले व त्याचा परिणाम म्हणजे सुपरहिट गीतांचा नजराणा आपणा सर्वांना मिळाला. असेच काहीसे **'जहाँआरा'** चित्रपटाच्या वेळी घडले होते. मदनजीना तलत मेहमूद व रफी दोघे हवे होते तरदिग्दर्शकाला फक्त रफीच. मदनजी सवयीनुसार चित्रपटावर पाणी सोडायला तयार झाले, दिग्दर्शक पुन्हा नमले. आज तलतने गायलेली जहाँआरा मधील प्रत्येक गझल एक मास्टर पीस बनली आहे. या शापित गंधर्वला अशा प्रकारे पदोपदी आपली प्रतिभा सिद्ध करावी लागली. नाही म्हणायला **'दस्तक'** साठी मिळालेले नेशनल अवार्ड त्यांना वेळेवर मिळालेले एकमेव अवार्ड म्हणता येईल.



मदन मोहन यांचे एकेक गाणे म्हणजे झगमगते नक्षत्र होते. **'अनपढ'** मधील ‘**आपकी नजरोने समझा प्यार के काबिल मुझे** ' हे गाणे ऐकून नौशाद उस्फूर्तपणे उद्गारले, "तुझ्या या एका गझलवर माझ्या सर्व स्वर रचना कुर्बान! तुझ्या या एका गझलेसाठी मी माझ्या सर्व रचना तुला द्यायला तयार आहे".



एकेकाळी मदनमोहन सचिनदांचे सहाय्यक होते. मदनमोहन यांच्या चालींचे गरुड सचिनदांवर पडले नसते तरच नवल! **'मेरा सुंदर सपना बीत गया'** हे गाणे मदनमोहन



यांचे आहे हे सांगण्यात सचिन दा यांना काहीच गैर वाटले नाही. इतकेच कशाला, आर. डी. चे सागर चित्रपटामधील गाणे, 'सागर किनारे दिल ये पुकारे' मदनमोहनजींच्याच **'यही है तमन्ना' (आपकी परछाईयाँ)** वर आधारित आहे. थोडक्यात काय तर लतादीदी प्रमाणेच मदनमोहनजी संगीतकारांचे पण लाडके होते.

पण आपण दर्जेदार असूनही उपेक्षित का आहोत या प्रश्नाचे उत्तर न सापडल्याने मदनजी दारूच्या आहारी गेले, निराशेच्या गर्तेत रुतत गेले व त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे १९७५ साली मदनमोहन नावाचा शापित गंधर्व या भूतलाला सोडून गेला. पण त्याची मोहिनी २००४ साली देखील '**वीर – जारा**'च्या रूपाने आपल्यावर पडली यातच या गंधर्वाचे महानपण सिद्ध होते. मदनमोहनजींच्या पश्चात का होईना आपण त्यांना त्यांची योग्य ती जागा देऊया. . . !!







# तेरे सूर और मेरे गीत



वसंत ऋतूला आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये एक आगळेच महत्व आहे. वसंत ऋतू म्हणजे चैतन्य, नाविन्य, माधुर्य यांचे प्रतिक ! संगीत क्षेत्रातील असेच एक वसंत ऋतू आहेत ; वसंत देसाई ... ज्यांनी आपल्या संगीतामधून भारतीय संस्कृती, शास्त्रीय संगीतातील राग दारी, व भारतीय लोक गीतांमधील माधुर्य रसिकांपुढे अलगद प्रस्तुत केले वसंत देसाई म्हटले कि डोळ्यासमोर येते ती 'ए मालिक तेंरे बंदे हम' म्हणणारी संध्या किंवा 'हमको मन कि शक्ती देना ' म्हणणारी जया. त्यांच्या या दोन्ही रचना रसिकांच्या मनाला इतक्या भिडल्या कि शाळाशाळांमधून ही गीते प्रार्थना म्हणून गायल्या जाऊ लागल्या. पंजाबमधीलच शाळा कशाला, पार सीमेपलीकडे, पाकिस्तान मधल्या तुरुंगांमध्ये देखील ही गाणी ऐकू येऊ लागली. आजच्या जमान्यातील टेक्नो म्युझिशिअन, ए आर रेहमान याला देखील 'हमको मनकी शक्ती देना'ही स्वर रचना वेडावून टाकते अशी आठवण खुद्द गुलझार साहेबांनी एके ठिकाणी सांगितली आहे



९ जून रोजी जन्मलेल्या वसंत देसाई यांनी मराठी व हिंदी चित्रपट, तसेच मराठी नाट्य क्षेत्रामध्ये खूप सुरेल कामगिरी केली आहे.

छम् छम् छम् . . . . . । छडी लागे छमछम, विद्या येई घमघम ; विख्यात कवी आणि गीतकार वसंत बापट यांनी लिहिलेले हे मजेदार गाणे वसंत देसाई यांनीच १९५३ साली



निघालेल्या श्यामची आई या चित्रपटासाठी स्वरबध्द केले होते आणि त्यावेळी बालवयात असलेले आताचे ज्येष्ठ संगीतज्ञ पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी ते गाणे गायिले होते.

वसंत देसाई म्हणजे विविध रागांची उधळण असे समीकरणच बनले होते. त्यांचा आवडता राग मल्हार होता पण इतर अनेक रागांचे देखील मिश्रण करून त्यांनी विविध प्रयोग केले. 'पंडितराज जगन्नाथ' या नाटकाला वसंत देसाईंनी संगीत दिले होते त्यातून 'कलावती' हा कर्नाटक संगीतातला राग त्यांनी महाराष्ट्राला परिचित करून दिला . प्रसाद सावकारांच्या खडय़ा आवाजातील 'जय गंगे भागीरथी' हे पद वास्तविक 'कलावती' आणि 'बसंत' या दोन रागांच्या मिश्रणातून वसंतरावांनी निर्माण केले आहे

जे जे उत्तम, उदात्त, सुंदर त्या त्या गोष्टीचा वसंत देसाई यांना ध्यास होता म्हणूनच त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गजांना आपल्या संगीत दिग्दर्शनाखाली अदाकारी दाखविण्यास प्रवृत्त केले. गुंज उठी शेहनाई मध्ये त्यांनी बिस्मिल्लाह खान यांची शेहनाई आपल्याला सुनावली तर "नैन से नैन नाहीं मिलाओ" मध्ये त्यांनी सुप्रसिद्ध संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांच्याकडून संतूर वाजवून घेतले होते. त्याच प्रमाणे आपल्या संगीताची शान वाढविण्यासाठी 'झनक झनक पायल बाजे'चे बहुचर्चित शीर्षक गीत वसंत देसाई यांनी अमीर खान खाँसाहेबांच्या आवाजात रेकोर्ड केले आहे

शास्त्रीय संगीत त्यांना फिल्मी संगीताएवढेच प्राणप्रिय होते म्हणूच ते पंडीत भीमसेन जोशी यांची मेहफिल आपल्या घरी वरचेवर सजवायचे. रम्य ही स्वर्गाहून लंका हे गाणे पंडितजी यांनी वसंत देसाई यांच्याच दिग्दर्शनाखाली गायले आहे. हिंडोल या गाण्यास कठीण असलेल्या रागात बहार हा दुसरा राग मिसळून हे गाणे वसंत देसाई यांनी बनविले होते. खरे तर पंडित भीमसेन सदैव शुद्ध राग गाण्याबाबत आग्रही असायचे पण केवळ वसंत देसाई यांसाठी मिश्र रागातील हे गाणे, त्या काळी २००० रुपये मानधन घेऊन पंडितजी गायले. देसाई यांनी देखील २च्या





जागी ५ हजार देऊन पंडितजींचा गौरव केला. पण त्या स्वर भास्कराने ठरल्याप्रमाणेच बिदागी घेतली वसंत देसाई म्हणजे एक अद्भुत व्यक्तिमत्व होते. त्यांची सुडौल, सुदृढ देहयष्टी पाहून काही लोकांना तर ते पहेलवान किंवा कसरतपटू वाटायचे. देसाई जितके धार्मिक वृत्तीचे होते तेवढे ते शृंगार व रसिकता या बाबतही जागरूक होते. ते सदैव हातामध्ये मोहक गजरा मिरवायचे . बहुदा हेच सर्व गुण त्यांच्या संगीतामध्ये उतरले होते. नैन से नैन नाहीं मिलाओमधील शृंगार भावना असो कि उठी उठी गोपाळा मधील सात्विक भाव . . त्यांच्या संगीताला तोडच नव्हती. कोरस चा उत्तम वापर कसा करावा हे देखील त्यांच्या कडूनच शिकावे. गुंज उठी शेहनाई मधील 'अखियाँ भूल गई है सोना' हे गाणे ऐकल्यावर त्याची प्रचीती येईल




आशीर्वाद चित्रपटातील 'एक था बचपन' या गाण्याच्यावेळी वसंत देसाई यांना लता दीदींकडून गाण्यामध्ये एक विशिष्ट जागा अपेक्षित होती. पण लता दीदी यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. देसाई यांना वाटले कि लताने त्यासाठी प्रयत्नच केले नाही. मोकळया स्वभावाच्या वसंत रावांनी ते दीदींना सांगितले. त्याचा परिणाम म्हणजे लता व वसंत देसाई यांमध्ये दुरावा आला . गुड्डी साठी म्हणूनच मग वाणी जयराम यांची वर्णी लागली. वसंत देसाई यांचे मोठे पण यातच होते कि लता शिवाय देखील त्यांनी 'बोले रे पपीहरा' व 'हमको मन कि शक्ती देना' सारखी गाणी सुपरहिट करून दाखविली.





वसंत देसाईंनी एकूण २० मराठी चित्रपटांना संगीत दिले. 'छोटा जवान' मधील 'माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमुचे सुरू, जिंकू किंवा मरू' हे गाणे किंवा 'मोलकरीण' मधील 'देव जरी मज', 'दैव जाणिले कुणी' ही गाणी आजही अपेक्षित परिणाम साधण्यात कुठेही कमी पडत नाहीत. लावणीसम्राज्ञी सुलोचना चव्हाण यांनी पहिली लावणी, आचार्य अत्रे यांच्या "हीच माझी लक्ष्मी" या चित्रपटात गायली. व त्याचे संगीतकार होते वसंत देसाई. अशा प्रकारे सुलोचना बाईंचे करिअर घडवण्यात त्यांचा खारीचा वाटा होता अशा या गुणी संगीतकाराचे अचानक अपघाती निधन झाले. तेही लिफ्ट मध्ये चिरडून. रसिकजन व अवघी संगीत चित्रपट सृष्टी या आपदेमुळे निःशब्द झाली व जेव्हा ते सर्व जण या धक्क्यातून सावरले तेव्हा त्यांच्या ओठी फक्त हेच शब्द होते 'दैव जाणिले कुणी'

९ जून आपल्या वसंत देसाई यांचा स्मृती दिन. . पण आपल्या दिवसाची सुरुवात ज्यांच्या भूपाळी मुळे होते व रात्रीचा शेवट देखील त्यांच्याच एखाद्या सुरेल गीतामुळे होतो त्या संगीतकाराला खरे तर आपण विसरलेलोच नसतो.... !!








# अंजाम-ए-महफ़िल

गेल्या महिन्यात श्री प्रशांत दांडेकर यांच्या महफ़िल-ए-प्रशांत या लेखसंग्रहांचं एक छोटं पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रसिद्ध झालं. मराठी वाचकांकडून या हिंदी सिनेसंगीतविषयक पुस्तकाला कसा प्रतिसाद मिळेल याबद्दल साशंकच होतो. पण जेव्हा शेकडो प्रतिक्रियांचा पाऊस पडला तेव्हा आमची अवस्था नैना बरसे रिमझिम अशी झाली. रश्मी कुलकर्णींना इसाक मुझावरची आठवण झाल्याचं त्यांनी कळवलं. पूजा राईलकर यांना त्यांच्या साध्या सुंदर भाषेने भुरळ घातली. मंजिरी जोशींनी अधिक विस्तृत लेखांची फ़र्माईश केली. सरस्वती मुळगे यांना त्यांच्या अनेक वर्षांच्या कुतुहलाचे उत्तर सापडले. किशोर पंडित व डॉ. अनिल खांडेकर यांनी अनेक आवडत्या संगीतकारांच्या लेखांची फ़र्माईश केली. गणेश शिरसाट, उदय पाटिल, विजय काकडे अशा अनेकांनी त्यातील सुंदर माहितीबद्दल आभार मानले. प्रसिद्ध कवयित्री आसावरी काकडे यांनी हे पुस्तक संग्रहणीय असल्याचे कळवले आहे. आदी विसपुते यांनी रफ़ी किशोरबद्दल अशाच माहितीचे पुस्तक यावे अशी फ़र्माईश केली तर शामला शिंदगी यांनी लता आशा बद्दल. जगातील सर्व देश, आणि महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांतून आलेल्या या पत्रांनी आम्ही भारावून गेलो. सुरेश पुरोहित यांनी तर या पुस्तकावर चक्क एक कविता सादर केली.

पाठविला तू ऐसा खजिना महफ़िलीचा पुराण्या , एका क्षणांत सारे जीवन तरूण मी अनुभवले अशा शब्दांत त्यांनी लेखकाच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.





म्हणून महफ़िल ए प्रशांत चा हा दुसरा भाग आज सादर केला. आपणा रसिकांचे उदंड प्रेम व पत्रे आमच्याकडे येतील अशी आशा आहे. नव्हे हक्कच आहे म्हणा ना.

ही मैफ़ल तुम्हाला कशी वाटली ते prashant. dandekar@rediffmail. com किंवा esahity@gmail. com वर कळवा. आपल्या प्रतिक्रियांवरूनच पुढल्या मैफ़लीची आखणी सुरू होईल. त्यात मग हेमंतकुमार, रफ़ी, किशोरदा, लतादिदी, आशाजी, साहिर, जावेद अख्तर, गुलजार अशा एक से एक दिग्गजांची मैफ़ल रंगवू. सारे काही आपल्या वाचकांच्या प्रतिक्रिया आणि फ़र्माईशींवर अवलंबून राहील. तेव्हा आपल्या प्रतिक्रिया लवकर येऊ द्यात. फ़ेसबुकवर esahityच्या पेजवर किंवा प्रोफ़ाईलवरही आपण आपल्या प्रतिक्रिया नोंदवू शकता. आपल्या मित्रांना या पुस्तकाच्या प्रती पाठवा. या पुस्तकाला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे आम्ही काही मोठ्या योजना आखत आहोत. लवकरच त्या कळवू.

**ई साहित्य प्रतिष्ठान** हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. हिंमते मर्दा. मददे खुदा. किंवा हल्लीच्या भाषेत सांगायचं तर सच्ची लगन हो तो अपने सपने हासिल करनेके लिये सारी कायनात एक हो जाती है. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. या आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया.





त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. आजचे हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला ते जाणवेलच.

पण आम्ही समाधानी नाही. बारा कोटींच्या या मराठी समाजात किमान एक दोन कोटी तरी समंजस, चोखंदळ वाचक असायला हवेत. ज्ञानोबा तुकोबांच्या संस्कारांत वाढलेल्या या समाजाकडून एवढी अपेक्षा ठेवायला काय हरकत आहे? मित्रहो. ज्योतीने ज्योत तेवत जावी. तसे वाचकांनीच वाचक जोडायला हवेत. तुम्हाला जर हे स्वप्न पूर्ण होण्यात हातभार लावावासा वाटत असेल तर फ़क्त एवढेच करा. आपल्या ओळखीपाळखीतल्या किमान दहावीस लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही VIP वाचक दर्जा देतो.

आमचा पत्ता : esahity@gmail. com

अधिक माहितीसाठी भेट द्या : www. esahity. com

आपले नम्र

**टीम ई साहित्य प्रतिष्ठान**



